■ बीड (महाराष्ट्र) ■ सायं.दैनिक ■ मराठी ■ वर्ष – ०२ ■ अंक – २६४ ■ गुरूवार दि.१२ जून २०२५ ■ आरएनआय – एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ ■ किंमत ३ रू. । पाने ४

■ Beed (Maharashtra) ■ Daily Evening ■ Marathi ■ Year - 02 ■ Issue - 264 ■ Thursday Dt.12 June 2025 ■ RNI : MAHMAR/2023/83965 ■ Price - 3 Rupees ■ Pages 4

# अहमदाबादमध्ये एअर इंडियाचं प्रवासी विमान कोसळलं, सगळीकडे धुराचे लोट..!

अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ
सायं.दैनिक महाराष्ट्र
आरंभ
संपादक : दिपक थोरात Mob.9860898564



## विमानतळावरून लंडनला निघालेल्या एअर इंडियाच्या विमानाला मेघानीनगर परिसरात अपघात

## विमानाला अपघात होताच आग; अपघातग्रस्त विमानात २४२ प्रवासी असल्याची माहिती?

बीड । प्रतिनिधी

गुजरातच्या अहमदाबादमध्ये विमानाला मोठा अपघात झालेला आहे. अपघाताचे फोटो, व्हिडीओ समोर आलेले आहे. अपघाताची घटना अहमदाबादमधील मेघानी परिसरात घडली. यानंतर परिसरात धुराचे लोट दिसू लागले. अपघातग्रस्त विमान प्रवासी वाहतूक करणारं आहे. त्यात किती प्रवासी आहेत, याबद्दल अद्याप स्पष्ट माहिती समोर आलेली नाही. रहिवासी भागात विमानाला अपघात झाला आहे. अहमदाबादमधून विमानानं उड्डाण करताच अपघात झाला. या विमानात कर्मचाऱ्यांसह एकूण २४२ जण असल्याची माहिती एएनआय वृत्तसंस्थेनं दिलेली आहे. हे विमान अहमदाबादहून लंडनला जात होतं. अहमदाबाद विमानतळावरुन विमानानं उड्डाण केल्यानंतर काही वेळात मेघानीनगर परिसरात विमानाला अपघात झाला. मेघानीनगर विमानतळापासून १५ किलोमीटर दूरवर आहे.

अपघात होताच अग्निशमन दलाच्या ७ गाड्या घटनास्थळी दाखल झाल्या. त्यांच्याकडून आग विझवण्याचं काम सुरु आहे. सोशल मीडियावर विमान अपघाताचे अनेक व्हिडीओ व्हायरल झाले आहेत. विमानाला अपघात होताच आग लागली. धुराचे लोट आसमंतात दिसू लागले. आपत्कालीन यंत्रणा सध्या अपघातस्थळी पोहोचलेल्या आहेत. अपघाताचं कारण अद्याप समजू शकलेलं नाही. मेघानीनगर परिसराजवळ असलेल्या धारपूरमध्येही धुराचे लोट दिसत आहेत.

अपघातग्रस्त विमान एअर इंडियाचं आहे. बोईंग ड्रीमलायनर ७८७ विमान ११ वर्षे जुनं असल्याची माहिती समोर आलेली आहे. अहमदाबादमधील सरदार वल्लभभाई पटेल आंतरराष्ट्रीय विमानतळावरुन विमानानं उड्डाण केलं. तांत्रिक बिघाडामुळे विमानाला अपघात झाला. अपघात होताच विमानानं पेट घेतला. आग विझवण्यासाठी अग्निशमन दलाचे कर्मचारी दाखल झाले. आग काही प्रमाणात नियंत्रणात आलेली आहे. अपघातात विमानाचा एक पंख तुटला आहे. तो विमानापासून वेगळा झाला आहे.



### युद्धपातळीवर बचावकार्य, आग विझविण्याचे प्रयत्न

टेक ऑफच्या अवघ्या १० मिनिटांत हे विमान कोसळल्यानंतर आता काही प्रवासी जखमी झाल्याचे सांगण्यात येत आहे. सध्या या ठिकाणी बचावकार्य सुरू आहे. या भागात अग्निशमन दलाच्या एकूण सात गाड्या दाखल झाल्या आहेत. विमानाला लागलेली आग विझविण्याचे प्रयत्न केले जात आहेत.

### मोठी हानी झाली असण्याची शक्यता?

एअर इंडियाच्या एआय–१७१ (बोइंग ७८७–८ ड्रीमलायनर विमान – सीरियल नंबर ३६२७९) या प्रवासी विमानाचा अपघात झाला आहे. २४२ प्रवाशांना घेऊन हे विमान अहमदाबादवरून लंडनला जात होतं. तसेच यात दोन पायलटसह १२ क्रू सदस्य होते. अहमदाबादमधील सरदार वल्लभभाई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या सीमेजवळच ही दुर्घटना घडली आहे. या विमानाने अहमदाबाद विमानतळावरून उड्डाण केल्यानंतर काहीच मिनिटात (७ किमी दूर) ते कोसळलं. विमानाचे पंख तुटून बाजूला पडल्याचं व्हिडीओंमध्ये दिसतंय. दरम्यान, अहमदाबाद पोलीस व अग्निशमन दलाने बचावकार्य सुरू केलं आहे.

### रहिवासी भागात कोसळलं विमान?

ज्या ठिकाणी हे विमान कोसळलं त्या भागात रहिवासी वस्ती आहे. अहमदाबाद विमानतळाजवळच हे विमान कोसळलं आहे. जिथे अपघात झाला, त्याच भागात अहमदाबाद येथील शासकीय रुग्णालय आहे. त्यामुळे दुर्घटनेत जखमी झालेल्या प्रवाशांना तातडीने रुग्णालयात दाखल केलं जात आहे.

## तुळजापुरच्या मातंगी देवी मंदिराचे ट्रस्ट बरखास्त करा

### मातंगी देवी मंदिर मातंग समाजाच्या ताब्यात देण्यासाठी मातंग महाक्रांती मोर्चा : मातंग ऱ्हदयसम्राट भास्कर शिंदे




माजलगांव । प्रतिनिधी

तुळजापुर येथील श्री मातंगी देवी मंदिर ट्रस्ट तात्काळ बरखास्त करून श्री आदिमाया आदिशक्ती मातंगी देवी मंदिर हे मातंगी वंशाची असून मातंग समाजाच्या तीन महिण्याच्या आता तात्काळ ताब्यात द्यावे अन्यथा राज्यभरातील मातंग समाजाच्या व लहुजीविद्रोही सेनेच्या वतीने दि. २२ /०९ /२०२५ वार सोमवार रोजी सकाळी ११.०० वाजता मातंग महाक्रांती मोर्चा काढण्याचा इशारा लहुजीविद्रोही सेनेचे संस्थापक अध्यक्ष मातंग – हदयसम्राट भास्कर नाना शिंदे यांनी धारावशिव जिल्हाधिकारी, तुळजाभवानी मंदिर संस्थान तुळजापुर, पोलिस, तहसिल कार्यालय, नगरपरिषद प्रशासन तुळजापुर यांना निवेदनाव्दारे दि. ९ जुन २०२५ रोजी दिला आहे.

दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, महाराष्ट्राची कुलस्वामीनी श्री आई तुळजाभवानी मंदिर क्षेत्र तुहजापुर संस्थान अंतर्गत श्री आदिमाया आदिशक्ती मातंगी देवी मंदिर हे हिंदु धर्म मंदिर असुन हे श्री मातंगी देवी मंदिर देशातील मातंग वंशाची श्रद्धास्थान ११ कोटी ६५ लाख मातंग समाजाची लोकांची कुलस्वामीनी असून संपुर्ण हिंदु मातंग समाज व बहुजन हिंदु लोकांचा आशास्थान व श्रद्धास्थान आहे. तिचा वंशक असुन सर्व मातंग समाजाच्या संविधानाने दिलेली जातीचे प्रमाणपत्र (कास्ट सर्टिफिकेट) यांच्यावर मातंग हा शब्द लिहीलेला असून हे मातंगी देवी चे खरे वंशक आहेत.

सध्याचे मंदिर व्यवस्थापन आजतागायत १९५६ ला हिंदु धर्म सोडून बौद्ध धर्मात गेले असून या मंदिराला बौद्ध धर्मातील एकही भावीक भक्त या मंदिराला पुजाअर्चा करण्यासाठी येत नसून हे श्री मातंगी मंदिर दुसऱ्या धार्माच्या लोकाच्या ताब्यात असल्यामुळे श्री मातंगी देवी मंदिर ची देखभाल, स्वच्छता, हक्क दुरूस्ती होत नाही सध्याची श्री आदिमाया मातंगी देवी मंदिराच्या मुख्य जाण्याच्या प्रवेशद्वारावर उजव्या व डाव्या साईजने १० द १० चे अतिक्रमण केले असून जवळपास २० फुट चे अतिक्रमण करून पक्के बांधकाम बांधले आहे. आणि प्रवेशद्वार ते मातंगी देवी मंदिराचे मुख्य मंदिरा पर्यंत दोन्ही बाजुने ३० ते ३५ दुकाने व्यवसायासाठी दुकान टाकुन अतिक्रमण केले असून ते फक्त एकाच जातीचे म्हणजेच बौद्ध लोकांनी केले असून मंदिराचा वापर चुकीच्या पद्धतीने करून अतिक्रमण केले असून हे

पान २ वर

## अवघ्या दोन तासात खुनाचा प्रयत्न करणारे पाच आरोपी जेरबंद



बीड । प्रतिनिधी

पोलीस स्टेशन पिंपळनेर हददीतील घाटसावळी गावात शेताच्या भांडणावरुन दोन गटांत हाणामारी झाल्याची माहिती मा. पोलीस अधीक्षक नवनीत काँवत साहेब यांना मिळताच त्यांनी सदरील गुन्हयातील आरोपींना अटक करण्याचे आदेश स्थानिक गुन्हे शाखेला दिले. स्थानिक गुन्हे शाखेचे प्रमुख पोलीस निरीक्षक श्री शिवाजी बंटेवाड यांनी लागलीच पथके नेमुन बीड जिल्हयात रावाना केले.

पान २ वर

## भाजपाच्या आजी–माजी आमदारांचा पक्षांतर्गत रुसवा

आष्टी । प्रतिनिधी

विधानसभा निवडणुकीत एकाच पक्षात असताना



वेगळी चूल मांडत सुरेश धस यांना कोंडीत पकडण्याचा प्रयत्न भीमराव धोंडे यांच्याकडून झाला पण मतदारांनी भरघोस मतांनी सुरेश धस यांना विजयी केले त्यानंतरही धस आणि धोंडे यांच्यातील दुरू संपला नसल्याचे दिसत नाही हे तिरंगा रॅलीतून दिसून आले भाजपाचे आजी माजी आमदाराचा रूसवा काढण्यात पक्षश्रेष्ठ यशस्वी होईल का? अशा प्रश्नात उपस्थित होत आहे.

आष्टी मतदारसंघात भाजपचे आमदार सुरेश धस व माजी आमदार भीमराव धोंडे दोन्हीही मातम्बर नेते आहेत. विधानसभा निवडणुकीत सुरेश धस भाजपकडून तर भिमराव धोंडे यांनी बंड करून आमने–सामने आले होते. यात सुरेश धस यांचा मोठ्या मताधिक्याने विजयी झाले. तेव्हापासून दुरावा निर्माण झाला तो आजही कायम आहे.

पान २ वर

## ४८ तासात चोरीस गेलेले १० लाख ५० हजार रुपयांचे सोने मिळवले परत



बीड । प्रतिनिधी

दिनांक आठ जून २०२४ रोजी, डॉक्टर लक्ष्मीकांत आंधळे यांच्या घरातून ते बाहेर गेले असताना घरात प्रवेश करून कोणीतरी अज्ञात इसमाने त्यांच्या कपाटात ठेवलेले गळ्यातली चैन, गंठण आणि अंगठी असे ११ तोळे सोने चोरट्याने चोरी करून नेले होते. दिवसा चोरी झाल्याने पोलिसांपुढे याची आव्हान तयार झाले होते.

सीसीटीव्हीच्या मदतीने त्या भागामध्ये कोण कोण गेले आहे यावर लक्ष ठेवण्यात आले. यातून एका महिलेला अटक करण्यात आली असून तिच्याकडून संपूर्ण गेलेला ऐवज जप्त करण्यात आला आहे. आरोपीचे नाव लक्ष्मी प्रमोद वडमारे राहणार पंचशील नगर बीड असे आहे. दोनच दिवसात पोलिसांनी चोरीस गेलेल्या मुद्देमाल परत मिळवल्यामुळे फिर्यादीने समाधान व्यक्त केले आहे. पोलीस अधीक्षक श्री नवनीत कावत आणि अपर पोलिस अधीक्षक श्री सचिन पांडकर यांनी घरफोडीचे गुन्हे उघडकीस आणण्यासाठी सर्व पोलीस ठाणे प्रभारी यांना सूचना दिलेल्या आहेत. त्यांच्या मार्गदर्शनानुसार पोलीस निरीक्षक श्री शितल कुमार बल्लाळ, सहाय्यक पोलीस निरीक्षक श्री बाबा राठोड, पोलीस अंमलदार संजय राठोड, मनोज परजणे, गहिनीनाथ बावनकर, राम पवार यांनी नमूद गुन्हा उघडकीस आणला आहे.

## गेवराई तालुक्याच्या राजकारणातलं बदामी रंगाचे वादळं भाजपाच्या तालमीत!

### महायुतीच्या मुंडे पॅटर्नवर पंडित पॅटर्न एकाच भात्यात!



### माजी मंत्री बदामराव पंडित शिवसेनाला जय महाराष्ट्र करण्याच्या तयारीत?

गेवराई । प्रतिनिधी

गेवराई मतदारसंघातील शिवसेना नेते माजी मंत्री बदामराव पंडित हे भाजपाच्या वाटेवर असल्याची जोरदार चचर्चा सुरू आहे. ही चर्चा सत्य असेल तर हा ठकरे सेनेला मोठा धक्का मानला जात आहे. तर दुसरीकडे राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे विजयसिंह पंडित विद्यमान आमदार असून तेही युतीमध्ये आहेत. यामुळे कट्टर विरोधक असलेले दोन्ही पंडित एका मॅनमध्ये दोन तलवारी कशा रहातील असाही प्रत्र उपस्थित केला जात आहे.

गेवराई विधानसभा मतदारसंघाचे पॉवरफुल नेते म्हणून माजीमंत्री बदामराव पंडित यांच्याकडे पाहिले जाते. ते अपक्ष म्हणून विजयी होऊन गेवराई मतदारसंघाचे नेतृत्व केले आहे. यामुळे गेवराई मधील त्यांच्या ताकदीचा अंदाज येऊ शकतो. यावेळी २०२४ मध्ये विधानसभा निवडणुकीत ते मत घेण्यात दुसऱ्या नंबरवर राहिले असून, आ. विजयसिंह पंडित आणि बदामराव पंडित या दोघांमध्येच खरी लढत झाल्याचे दिसून आले आहे. तर मागील काही वर्षांपासून बदामराव पंडित हे शिवसेना ठाकरे गटात स्थिरावले आहेत. ते बीड जिल्ह्यातील शिवसेनेचा मोठा चेहरा मानले जातात. यांमुळेच विधानसभा निवडणुकीत ही जागा राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाची असताना ही पक्षप्रमुख उद्धव ठाकरे बांनी जोर लावून महाविकास आघाडीच्या जागा वाटपात बदामराव पंडित यांच्यासाठी गेवराई मतदारसंघाची जागा आपल्या कडे घेतली, येथे बदामराव पंडित यांना तेथून उमेदवारी दिली. या निवडणुकीत त्यांचा पराभव

पान २ वर

खाजगी संस्थांच्या दावणीला बांधलेल्या जिल्हा प्रशासनामुळे नांदुरघाटची जि.प. शाळा वाचवण्यासाठी

# अमोल जाधववर आत्मदहनाचा इशारा देण्याची वेळ यावी हि लाजिरवाणी बाब

बीड । प्रतिनिधी

एकीकडे येत्या शैक्षणिक वर्षापासून पहीलीपासुन विद्यार्थ्यांना सीबीएसई पॅटर्न राबविण्यात येणार आहे. त्यामुळे गावच्या मुलांनी इंग्रजी माध्यमांच्या शाळांकडे न जाता गावातीलच जिल्हा परिषदेच्या शाळेत शिक्षण घ्यावे यासाठी २५% पटसंख्या वाढीचे उद्दिष्ट शासनाने दिले असून त्यासाठी आवश्यक सूचना दिलेल्या आहेत. जिल्हापरीषदेच्या शाळांमध्ये पटसंख्या वाढविण्यासाठी शिक्षकांनी जुनच्या पहिल्या आठवड्यापासून कामाला लागण्याच्या सुचना दिलेल्या आहेत. मात्र याचवेळी केज तालुक्यातील नांदुरघाट येथील जिल्हा परिषदेची शाळा वाचवण्यासाठी शालेय शिक्षण समिती अध्यक्ष अमोल सखाराम जाधव यांनी शिक्षण विभाग व जिल्हा प्रशासन सहकार्य न करता खाजगी संस्था चालकांचे हित जोपासत अडथळे निर्माण करत असल्याने दि.१४ जुन रोजी शाळेच्या प्रांगणात आत्मदहनाचा इशारा जिल्हा प्रशासनाला दिला आहे. अमोल जाधव यांच्या न्याय मागण्या मान्य करून त्यांना आत्मदहनापासुन परावृत्त करण्यात यावे हि शासन आणि प्रशासनासाठी लाजीरवाणी बाब असल्याचे



म्हणत मुख्यमंत्री, पालकमंत्री बीड, शिक्षणमंत्री, विभागीय आयुक्त यांना जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद, शिक्षणाधिकारी जिल्हा परिषद बीड यांच्या मार्फत लेखी निवेदनाद्वारे मागणी केली आहे.

**नांदरघाट जिल्हा परिषद शाळेसाठी नांदुरघाट ग्रामस्थांचे कौतुकास्पद उपक्रम**

नांदुरघाट येथील जिल्हा परिषद शाळा वाचविण्यासाठी नांदुरघाट ग्रामस्थांचा लढा गेल्या १८ महिन्यांपासून सुरू असुन जिल्हा परिषदेच्या शाळेतील विद्यार्थ्यांच्या पालकांना घरपट्टी, नळपट्टी आदी ग्रामपंचायतने करमाफी देण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतला आहे. तसेच शाळेत सीसीटीव्ही, शैक्षणिक साहित्य आणि पटसंख्या भरपूर असुन विद्यार्थ्यांना उत्तेजन देणारे उपक्रम राबविण्यात येत असुन गुणवत्तापूर्ण विद्यार्थी आहेत. शाळेमध्ये सर्वांगीण विकासासाठी नांदुरघाट ग्रामसथ मोलाचे योगदान देत आहेत.

**एकीकडे पटसंख्या वाढवणाऱ्या शाळांचा गौरव आणि दुसरीकडे नांदुरघाट सारख्या शाळा बंद पाडणार..हा शिक्षण विभाग आणि जिल्हा प्रशासनाचा दुटप्पीपणा : डॉ.गणेश ढवळे**

जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये पटसंख्या वाढविण्यासाठी शिक्षकांनी जनजागृती करावी, पालकांशी संपर्क करावा, सर्वेक्षण, अंगणवाडी, गृहभेटीतुन जनजागृतीचे उपक्रम राबवुन पटसंख्या किमान १५ ते २५ टक्के जास्त वाढविण्याचे निर्देश शिक्षण आयुक्तांनी दिले आहेत. सर्वात जास्त पटनोंदणी केलेल्या शाळांचा गौरव करण्यात येणार आहे आणि दुसरीकडे नांदुरघाट येथील जिल्हा परिषदेच्या शाळेत पटसंख्या वाढविण्यासाठी प्रयत्नशील ग्रामस्थांची अडवणूक केली जात असुन असा दुजाभाव का? त्यासाठी अमोल जाधव अध्यक्ष शालेय शिक्षण समिती यांच्यावर आत्मदहनाची वेळ यावी हा ढोंगीपणा नाही का? असा संतप्त सवाल डॉ.गणेश ढवळे यांनी उपस्थित केला आहे.

# लग्नामध्ये खिसे कापणारा चोर पकडला

## स्थानिक गुन्हे शाखेची कामगिरी

बीड । प्रतिनिधी

मा.पोलीस अधीक्षक बीड यांनी बीड जिल्हयामध्ये चोरीच्या घटना होत असल्याने चोरी करणाऱ्या आरोपींना पकडणयाचे स्थानिक गुन्हे शाखेला सुचना दिल्या होत्या. त्याअनुषंगाने पोलीस हवालदार भागवत शेलार यांना गोपनिय बातमी मिळाली की, दि.०८.०६.२०२५रोजी बीड येथील सुर्या लॉन्स मधील लग्नामध्ये पोलीस ठाणे शिवाजीनगर गु.र.नं ३२२/२०२५ कलम ३०३(२) बी.एन.एस मधील फिर्यादीचे पैसे चोरलेला आरोपी हा पंचायत समीती,बीड समोर हॉटेलवर चहा पित बसल्याची माहीती मिळाल्यावरुन यातील आरोपी नामे रामचंद्र गायकवाड, वय २२ वर्ष, रा. सुभाष कॉलणी बीड यास झडप मारुन पकडले. त्यास विश्वासात घेवुन अधिक विचारपुस केली असता त्यांने गुन्हा केल्याचे कबुल केले, त्यानी लग्नामध्ये



चोरलेले ४५,५००/- रु हस्तगत करुन आरोपी व मुद्देमाल पोलीस ठाणे शिवाजीनगर यांचे पुढील तपासकामी ताब्यात दिले आहे. सदरील तपास हया महीला पोलीस हवालदार श्रीमती खरमाटे हया करीत आहेत.

सदरील कारवाई हीश्री. नवनित कॉंवत, पोलीस अधीक्षक बीड, श्री.सचिन पांडकर, अपर पोलीस अधीक्षक बीड यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक शिवाजी बंटेवाड, पोलीस हवालदार भागवत शेलार, दिपक खांडेकर, विकास राठोड सर्व नेमणुक स्थानिक गुन्हे शाखा बीड यांनी केली आहे. सदरील चोरीचा गुन्हा उघड झाल्याने ज्या ईसमांचे पैसे चोरी गेले होते त्यांनी समाधान व्यक्त केले आहे.

पान १ वरून...

### भाजपाच्या आजी-माजी आमदारांचा पक्षांतर्गत रुसवा

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूक काही महिन्यात होऊ शकतात, अशी राजकीय संकेत आहेत. ऑपरेशन सिंदूर नंतर आमदार सुरेश धस यांनी तिरंगा रॅली काढली त्यानंतर आठ दिवसात भीमराव धोंडे यांनी तिरंगा रेल्वे काढून धुसफूस कायम असल्याचे दाखवून दिले.

सुरेश धस मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस यांचे तर धोंडे हे पंकजा मुंडे यांचे समर्थक म्हणून ओळखले जातात. पक्षश्रेष्ठ या दोन्ही आजी माजी आमदारांचे मनोमिलन करण्यात यशस्वी होणार का असा प्रश्न या निमित्ताने उपस्थित होत आहे.

### अवघ्या दोन तासात खुनाचा प्रयत्न करणारे पाच आरोपी जेरबंद

मोठ्या शिताफिने अवघ्या दोन तासात आरोपी क्र. १) सुग्रीव नामदेव लांडे २) महेश ऊर्फ मसु वैजिनाथ लांडे ३) रेवन नामदेव लांडे ४) प्रकाश मुक्तीराम लांडे ५) महादेव नवनाथ लांडे सर्व रा. घाटसावळी तालुका जि. बीड. या आरोपींना अटक केली आहे.

सदरची कामगिरी मा.श्री. नवनीत कॉंवत साहेब, पोलीस अधीक्षक (खझड) बीड, मा.श्री. सचिन पांडकर अपर पोलीस अधीक्षक बीड, पोनि श्री. शिवाजी बंटेवाड, स्था.गु.शा.बीड यांचे मार्गदर्शनाखाली पोउपनि सिध्देश्वर मुरकुटे, राहुल शिंदे, महेश जोगदंड, राजु पठाण, बप्पासाहेब घोडके, विक्की सुरवसे, गणेश मराडे, सुनिल राठोड, गणेश हंगे यांनी केली आहे.

### तुळजापुरच्या मातंगी देवी मंदिराचे..

अतिक्रमण तात्काळ काढणे गरजेचे होते परंतु तसे होत नाही व उलट श्री मातंगी देवी मंदिराची वेगवेगळ्या माध्यमातुन विटंबना करत असून त्या करीता हे मंदिर मातंग समाजाच्या ताब्यात देण्यात यावे म्हणजे मातंग समाजाचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, सचिव इ. सर्व संचालक असावेत कारण या मदिराची स्वच्छता ठेवली जाईल श्री मातंगी देवी मंदिरात असलेल्या भक्ताकडून आलेले पैसे, सोने, चांदी, तांबे, पितळ, कपडा यांचा हिशोब ठवेला जाईल सध्या मंदिराचा वापर फक्त आणि फक्त दुकानदारांनी व गुत्तेदारीसाठी वापर केला जातो.

श्री मातंगी देवीचे मंदिराचा वापर दुकानदारी व दुरूपयोग करत असून ज्यांनी हिंदु धर्म सोडला आहे अशा लोक हक्क फक्त दुकानदारीसाठी गाजवत असून आमचया मंदिराचा दुरूपयोग करत असून खरेतर मातंग समाजाच्या स्वतंत्र वंश असून मातंग समाज हिंदु धर्म सोडून गेला नसुन हि आमच्या हक्काचे देवस्थान आमच्या ताब्यात देण्यात यावे व सध्या श्री मातंगी देवी ट्रस्ट तात्काळ बरखास्त करून त्याच्या मनमानी कारभार बंद करण्यात यावा श्री आदिमाया आदिशक्ती मातंगी देवी मंदिर मातंग समाजाच्या ताब्यात ३ महिन्याच्या आत देण्यात यावे नसता संपुर्ण महाराष्ट्रातील मातंग समाजाच्या वतीने लोकशाही मार्गाने लहुजी विद्रोही सेनेच्या वतीने तिव्र मोर्चा सोमवार दि. २२/०९/२०२५ रोजी सकाळी ११.०० वा. तुळजापुर येथील डॉ. अण्णाभाऊ साठे चौक ते तुळजाभवानी मंदिर च्या मुख्य द्वारापर्यंत काढण्याचा इशारा देण्यात आला आहे. निवेदनावर भास्कर नाना शिंदे, सोपान उकांडे, लक्ष्मी भीसे, तावजी क्षिरसागर, शिवाजी कांबळे, मंगेश शिंदे, परशुराम चौरे यांच्या स्वाक्ष-या आहेत.

### गेवराई तालुक्याच्या राजकारणातलं बदामी रंगाचे वादळं...

होऊन राष्ट्रवादी कॉंग्रेस अजित पवार गटाचे विजयसिंह पंडित विजयी झाले. पराजित झाल्यानंतर ते म्हणावं तसे मतदारसंघात सक्रीय दिसत नाहीत.

अनेक प्रश्न असून ज्यावर शासनाला धारेवर धरु शकतात. पण तसे कुठेही दिसत नाही. हेच कारण की, इतर काही पण माजीमंत्री बदामराव पंडित भाजपाच्या वाटेवर असल्याची गेवराई मतदारसंघात जोरदार चर्चा सुरू आहे. या चर्चेवर बदामराव पंडित यांनी अद्याप कोणतीही प्रतिक्रिया दिलेली नाही. यामुळे त्यांची भूमिका काय हे स्पष्ट नाही. पण चर्चा सुरू आहे हे मात्र खरे आहे. यात जर तथ्य असेल आणि त्यांनी पक्षांतर केले तर हा बीड जिल्ह्यात शिवसेना उद्धव ठाकरे गटाला मोठा धक्का मानला जाणार आहे, एकमेव असलेला मोठा चेहरा जाणार की, पक्ष त्यांना धांबविणार हे दिसून येईलच पण दुसरी आणखी एक अशीही चर्चा सुरु आहे की, विद्यमान आमदार विजयसिंह पंडित हेही महायुती मध्येच आहेत. बदामराव पंडित यांनी भाजपात प्रवेश केला तर ज्यांनी आमनेसामने निवडणूक लढविणार कट्टर विरोधक एकत्र येतील का? याचा तोंडावर असलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीत याचा परिणाम होणार असल्याची चर्चा सुरू आहे. यामुळे ही फक्त चर्चा असून नेमके घडणार काय? हे पहाणे रंजक ठरणार आहे.

# ज्योतीताई, मेटे साहेबांच्या नावाखातर तरी आयटीआयकडे लक्ष द्या

## विद्यार्थी आणि पालक फिरवताहेत पाठ - एस.एम.युसूफ

बीड । प्रतिनिधी

जिल्ह्यातील २८ आयटीआयमध्ये ३१४० जागा असताना आतापर्यंत फक्त २५०० विद्यार्थ्यांचेच अर्ज आले आहेत. यामुळे विद्यार्थ्यांनी आयटीआय कडे पाठ फिरवली की काय असा प्रश्न उपस्थित होऊ लागला आहे.

विद्यार्थी आणि पालकांमध्ये आयटीआय बद्दल दिसून येत असलेली अनास्था एक तर येथे प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना चांगले शिक्षण दिले जात नाही. विद्यार्थ्यांच्या अनुपस्थितीवर शिक्षकांचा आणि शिक्षकांच्या अनुपस्थितीवर प्राचार्यांचा कुठलाही अंकुश नाही. वर कहर म्हणजे येथून काहीतरी वेडेवाकडे शिक्षण घेऊन बाहेर पडलेल्या विद्यार्थ्यांना रोजगारही मिळत नाही. अशी कारणे समोर येत आहेत. ही बाब लक्षात घेता येथील विद्यार्थ्यांना चांगले शिक्षण देणे. विद्यार्थ्यांसह शिक्षकांच्या नियमित उपस्थिती वर भर देणे. येथील शिक्षकांनी न शिकविताही उत्तीर्ण होऊन सनद घेत बाहेर पडलेल्या विद्यार्थ्यांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे आवश्यक असताना आयटीआय व्यवस्थापनाकडून मात्र या बाबीकडे दुर्लक्ष करून इतर बाबींचाच







आटापिटा करण्यात येत असल्याचे बोलले जात आहे. एक वेळ अशी होती जेव्हा शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये नंबर लागावा म्हणून विद्यार्थ्यांसह पालकही अक्षरशः देव पाण्यात घालायचे आज विद्यार्थी मिळावी म्हणून आयटीआयच्या इन्स्ट्रक्टरांना दारोदारी फिरावे लागत आहे. ही अवस्था सुधारण्यासाठी ज्योतीताई मेटे यांनी आता बीड च्या शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेकडे लक्ष द्यावे. कारण या औद्योगिक प्रशिक्षण संस्थेला दिवंगत विनायकराव मेटे यांचे नाव देण्यात आले आहे. निदान मेटे साहेबांच्या नावाखातर तरी ज्योती ताईंनी लक्ष देणे गरजेचे आहे असे मुक्तपत्रकार एस.एम.युसूफ यांनी म्हटले आहे.

या विषयी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकात नमूद केले आहे की, बीडच्या औद्योगिक प्रशिक्षण संस्थेबद्दल अनेक जागरूक पालक आयटीआय व्यवस्थापनाकडे तक्रारी करत असूनही त्याची नोंद घेतली जात नसल्याचे बोलले जात आहे. मोठ्या आशेने या प्रशिक्षण संस्थेमध्ये प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांवर हा सर्व प्रकार अन्यायकारक आहे. सर्वसामान्य गोरगरीब कुटुंबातील पालक आपल्या पाल्यांना शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत मोठ्या आशेने यासाठी टाकतात की ते काहीतरी व्यवसायिक औद्योगिक प्रशिक्षण घेऊन येथून बाहेर पडतील आणि आपले आयुष्य चांगले स्थिरस्थावर जगण्याकरिता स्वयं रोजगार करतील किंवा येथून मिळविलेल्या शिक्षणाच्या बळावर औद्योगिक क्षेत्रात नोकरीस तरी लागतील. असे पूर्वी व्हायचे परंतु गेल्या काही वर्षांपासून मात्र पालकांच्या या धारणेचा पार बट्ट्याबोळ झाला आहे. शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था चालविण्यासाठी जे गांभीर्य शासन-प्रशासनाने दाखवायला हवे ते दाखविले जात नाही. शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेबद्दल शासन-प्रशासनाला आस्था राहिली नसल्याचेही बोलले जात आहे. तसेच येथून बाहेर पडलेल्या विद्यार्थ्यांना रोजगारही उपलब्ध होत नाहीये. यामुळे येथे प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या दिवसेंदिवस रोडावत चालल्याचेही बोलले जात आहे. तसेच विद्यार्थ्यांना पिण्यासाठी आयटीआय मध्ये साधे पाणी सुद्धा नाही. एवढ्या अनास्थे आणि दुर्लक्षतेने ही शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था चालविली जात आहे. यामुळे आता ज्योतीताई यांनी निदान मेटे साहेबांच्या नावाखातर तरी बीडच्या आयटीआय कडे लक्ष द्यावे असे आवाहन मुक्तपत्रकार एस.एम.युसूफ यांनी केले आहे.

# धम्मदीप बुद्ध विहार बीड येथे संत कबीर यांची जयंती व जेष्ठ पौर्णिमा पूज्ज भंते आचलानंदजी यांच्या उपस्थित संपन्न

बीड । प्रतिनिधी

दि.११/०६/२०२५ रोजी सायंकाळी ०७:०० वाजता धम्मदीप बुद्ध विहार( बलभीम नगर) शिवाजीनगर पालवण रोड बीड विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे दुसरे गुरु संत कबीर यांच्या जयंतीचा व जेष्ठ पौर्णिमेचा कार्यक्रम आयोजित केला होता या कार्यक्रस प्रमुख धम्मदेसना देण्यासाठी पूर्णा येथील पूज्ज भंते आचलनांदजी व प्रमुख पाहुणे म्हणून नगरसेवक आयु.विनोदजी मुळूक व आयु.कॅप्टन राजाभाऊ आठवले तसेच आयु डी. जी. वानखडेबाबा यांची उपस्थिती होती.

या कार्यक्रमात प्रमुख पाहुण्याच्या हस्ते तथागत गौतम बुद्ध संत कबीर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन



करून कॅप्टन आठवले व वानखडे बाबा यांनी बौध्द उपासक उपसिक यांनी आपल्या मुलांवर बुद्ध धम्माचे संस्कार होण्यासाठी बौध्द बांधवानी सर्व प्रकारचे मतभेद दूर ठेऊन प्रत्येक महिण्याच्या पौर्णिमेस व दर रविवारी बुद्ध विहारात येऊन आपले सन उत्सवं एकत्र येऊन साजरा करणे ही कळाची गरज आहे असे मत मांडले तसेच धम्मामधील दान पारमितेचे महत्व सांगितले त्या नंतर पूज्ज भंते आचलानंदजी यांनी जेष्ठ पौर्णिमे बद्दल भगवान बुद्धाच्या जीवनातील प्रसंघ सांगून धम्मदेसना दिली. शेवटी सरणतंय घेऊन ड तेजस वडमारे यांनी आभार प्रदर्शन केले या कार्यक्रमास आयु. जयश्री विशाल वडमारे यांनी खीरदान केले.

या कार्यक्रमास अंजली तेजस वडमारे, कोमल वाघमारे, सरिता खेमाडे, अर्चना जाधव, आशा धनवे, आचल वडमारे, मालन अंकुटे, जयश्री गवळी, रामाबाई सोनवणे, आम्रपाली गवळी, जानवी वाघमारे, प्रीती जाधव,आशा भालेराव, आयु.विशाल वडमारे, कुलदीप गवळी व शिवाजीनगर बलभीम नगर, मित्र नगर, दिलीप नगर परिसरातील बौध्द उपासक उपासिका, बालक बालिका मोठयासंख्येने उपस्थित होते.

# मुले आई-वडिलांची नक्कल करतात म्हणून माऊली दादा सारखे संस्कार करा : प्रदीप मिश्राजी

## माऊली दादासारखे संत कलियुगात पुन्हा होणे नाही : ह.भ.प. रामराव ढोक महाराज

चाकरवाडी । प्रतिनिधी

विसाव्या शतकातील महान सद्गुरू संत ज्ञानेश्वर महाराज यांच्या पंचेविसाव्या पुण्यस्मरणार्थ आज ह.भ.प. रामराव ढोक महाराज यांचे गुलालाचे कीर्तन झाले रामराव महाराज ढोक यांनी माऊली दादाच्या आठवणींना उजळा देत माऊली दादाची कीर्ती चंद्र सूर्य असे पर्यंत अजरामर झाली आहे माऊली दादाचा वारसा तपोनिधी शांतीब्रह गुरुवर्य श्री महादेव महाराज तात्या चाकरवाडीकर हे अतिशय समर्पक भावनेतून पुढे नेत आहेत. माऊली दादा सारखे संत या घोर कलियुगात पुन्हा होणे नाही असे ह.भ.प. रामराव ढोक महाराज यांनी कीर्तनात प्रतिपादन केले.

शिवमहापुराण कथेत प.पूज्य. प्रदीप मिश्राजी यांनी शिवमहापुराण कथेत सांगितले की घरातील वातावरण अध्यात्मिक आणि सुसंस्कृत असले पाहिजे टीव्ही मोबाईल पाहण्यापेक्षा आध्यात्मिक व संस्कार निर्माण करणारी पुस्तके आई वडिलांनी वाचावीत, यामुळे मुलांवर चांगले संस्कार होतील. मुले आई-वडिलांचे नक्कल करत असतात असे मार्गदर्शन प्रदीप जी मिश्रा यांनी केले. श्री क्षेत्र चाकरवाडी येथे विसाव्या शतकातील महान संत ज्ञानेश्वर माऊली यांच्या कृपाशीर्वादाने व तपो निधी शांती ब्रह्मा गुरुवर्य महादेव महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू असलेल्या अखंड हरिनाम सप्ताह व शिवपुराण कथेत परमपूज्य प्रदीप जी मिश्रा बोलत होते.

यावेळी पुढे बोलताना प्रदीप जी मिश्रा यांनी मोलाचे मार्गदर्शन केले शिवपुराण कथेचे महत्व विशद करत असतानाच सध्याच्या परिस्थितीवर ही त्यांनी भाष्य केले शरीर व मनाची भूक भागवण्यासाठी अध्यात्माची अत्यंत गरज आहे. शरीर हे कष्टरहीत असावे तर मनाची भूक भागविण्यासाठी अध्यात्माची गरज आहे मन हे भक्तीत आणि शरीर हे कष्टात समाविष्ट करणे गरजेचे आहे. संत ज्ञानेश्वर माऊली दादा हे आध्यात्मिक होते शिवशंकरावर त्यांचे अपार श्रद्धा होती मोठी भक्ती होती श्रद्धा होती त्यांच्या आचरणाचे सर्व संस्कार महादेव महाराज या मुलांमध्ये उतरले मुले ही आई-वडिलांचे नक्कल करत असतात त्यामुळे आई-वडिलांचे वर्तन हे सुसंस्कृत व अध्यात्मिक असायला हवे. पुढे मुले ही याच वृत्तीचे अनुकरण करत असतात.आई वडीलांनी घरात टीव्ही मोबाईल पहात बसण्यापेक्षा आध्यात्मिक व सुसंस्कृत पुस्तके वाचवित. याचा परिणाम मुलांवर होत असून मुलेही चांगल्या विचारांची निर्माण होतील. पत्नी, मुले यांना वेळ द्या, परिवारासाठी परिवारासाठी वेळ देण्याची तयारी ठेवा पती-पत्नीने त्यागी वृत्ती अंगीकारली तर कुटुंबात कलह निर्माण होऊ शकत नाही. भोलेनाथ भक्ती केल्यानंतर कोणालाही नाराज करत नाहीत त्यामुळे शिवशंकरावर श्रद्धा ठेवून ती करा जीवनात नक्कीच दुःख संपवून आनंद निर्माण होईल असे मुलाचे विचार याप्रसंगी प्रदीप जी मिश्रा यांनी व्यक्त केले.

**पावसाची हजेरी**

चाकरवाडी येथे सुरू असलेल्या शिवपुराणकथेस आज भाविकांनी गर्दीचा उच्चांक निर्माण केला. अशा परिस्थितीत पावसाने जोरदार हजेरी लावली. त्यामुळे भाविकांनी भर पावसात छत्री आणि गोपाटचा आधार घेत शिवपुराण कथा ऐकण्याचे पुण्य पदरात पाडून घेतले.

**मान्यरांची भेट**

संत ज्ञानेश्वर माऊली यांच्या आशीर्वादाने सुरू असलेल्या अखंड हरिनाम सप्ताहाला भाविकांची प्रचंड गर्दी होत असून मान्यवर लोकही भेटी देत आहेत. बुधवारी गोरख बाबा, माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर, माजी मंत्री बदामराव पंडित, नंदकिशोर मुडदा सह आदींनी भेटी देऊन शिवपुराण कथेचा लाभ घेतला.



# प्रा.एस.के.जोगदंड यांच्या जीवनचरित्रावरील गौरव ग्रंथाचे अंबाजोगाईत प्रकाशन

## 'चळवळ कशी उभी राहते' हे समजून घेण्यासाठी नव्या पिढीने 'सम्यक पांथस्थ आबा' हा ग्रंथ अभ्यासावा : ज्येष्ठ विचारवंत ज.वि.पवार

अंबाजोगाई । प्रतिनिधी

एकेकाळच्या दलित युवक आघाडीचे लढाऊ शिलेदार, वंचित बहुजन आघाडीचे जेष्ठ नेते, पुरोगामी परिवर्तनवादी चळवळीतील कार्यकर्त्यांचे प्रेरणास्थान आणि अंबाजोगाई येथील योगेश्वरी शिक्षण संस्थेतील इंग्रजी विषयाचे सेवानिवृत्त प्रा.एस.के.जोगदंड यांच्या जीवनचरित्रावरील 'सम्यक पांथस्थ आबा' या गौरवग्रंथाचा प्रकाशन समारंभ मान्यवरांच्या हस्ते व प्रमुख उपस्थितीत रविवारी शहरातील विलासराव देशमुख न.प.सभागृह, अंबाजोगाई येथे आयोजित करण्यात आला होता.

गौरवग्रंथ प्रकाशन समारंभाच्या अध्यक्षस्थानी डॉ.सुरेश खुरसाळे (माजी अध्यक्ष, योगेश्वरी शिक्षण संस्था.) हे होते. तर गौरवग्रंथाचे विमोचन ज.वि.पवार (ज्येष्ठ विचारवंत व आंबेडकरी चळवळीचे भाष्यकार, मुंबई.) यांच्या हस्ते व मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत रविवार, दिनांक ८ जुन रोजी करण्यात आले. तसेच यावेळी गौरवग्रंथावर भाष्यकार म्हणून बोलताना प्रसिद्ध साहित्यिक प्रा.डॉ.प्रल्हाद लुलेकर (छत्रपती संभाजीनगर) यांनी सांगितले की, प्रा.एस.के.जोगदंड यांच्यासारखा विद्यार्थीभिमुख प्राध्यापक आता होणे नाही. समाजासाठी आबांनी मोठा त्याग केला असे प्रा.डॉ.लुलेकर म्हणाले. तर सामाजिक कार्यकर्त्या मंगलताई खिंवसरा (छत्रपती संभाजीनगर) यांनी आबांच्या यशस्वी वाटचालीत त्यांच्या सुविद्य पत्नी सुधाताई यांचे ही मोठे योगदान आहे असा त्यांचा गौरवपूर्ण उल्लेख केला. यावेळी डॉ.बाबासाहेब आंबेडकर चरित्र साधने समितीचे माजी सदस्य प्रा.पी.जी.जोगदंड (मुंबई) यांनी आपल्या भाषणात आबांचे कार्य, त्याग, समर्पण आणि जीवनमूल्ये जपत केलेला संघर्षमय प्रवास उलगडला. आबांनी अनेक विद्यार्थी घडवले. जे आज मोठ-मोठ्या पदांवर कार्यरत आहेत. चळवळ पुढे नेण्यासाठी समाजात आता दुसरे 'आबा' तयार झाले पाहिजेत अशी अपेक्षा प्रा.जोगदंड यांनी व्यक्त केली. यावेळी आबांच्या सुविद्य पत्नी सुधाताई जोगदंड, पत्रकार सुरेश पाटील (छत्रपती संभाजीनगर) तसेच प्रा.एस.के.जोगदंड यांनीही आपले समायोचित मनोगत व्यक्त केले.




यावेळी बोलताना ज्येष्ठ विचारवंत ज.वि.पवार यांनी 'चळवळ कशी उभी राहते, परिवर्तनाची लढाई कशी लढली जाते आणि चळवळीचे फलित कसे मिळवले जाते.' हे जाणून घेण्यासाठी नव्या पिढीतील कार्यकर्त्यांनी 'सम्यक पांथस्थ आबा' हा ग्रंथ जरूर वाचावा, अभ्यासावा असे आवाहन पवार यांनी उपस्थितांना केले. अध्यक्षीय समारोप करताना डॉ.सुरेश खुरसाळे म्हणाले की, प्रा.एस.के.जोगदंड यांच्या सारख्या प्राध्यापक, कार्यकर्त्याची गरज काल ही होती. पण, कालच्या पेक्षा आज जास्त आहे. एकिकडे प्राध्यापक म्हणून काम करताना प्रा.जोगदंड सरांनी विद्यार्थ्यांना शिकवत त्यांच्या प्रश्नांची सोडवणूक ही केली. तसेच दुसरीकडे एक कार्यकर्ता म्हणून त्यांनी चळवळ ही उभी केली. त्यामुळे विद्यार्थी, कार्यकर्ते आणि युवकांसाठी 'सम्यक पांथस्थ आबा' हा गौरवग्रंथ प्रेरक आणि दिशादर्शक ठरेल असा विश्वास डॉ.खुरसाळे यांनी व्यक्त केला.

प्रारंभी मान्यवरांनी तथागत गौतम बुद्ध आणि महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस अभिवादन केले. आयोजकांनी मान्यवरांचे स्वागत केले. बोधिघाट महिला मंडळाने 'अतिथी हा जयभीम घ्यावा' हे स्वागतपर गीत सादर केले. वंचित बहुजन आघाडीकडून ज्येष्ठ विचारवंत ज.वी.पवार यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ.वाल्मिक सरवदे (प्र.कुलगुरू, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर) यांनी केले. तर सुत्रसंचालन माजी मुख्याध्यापक लंकेश वेडे यांनी करून उपस्थितांचे आभार सुखदेव भुंबे यांनी मानले. प्रा.एस.के.जोगदंड यांच्या जीवनचरित्रावरील 'सम्यक पांथस्थ आबा' या गौरवग्रंथाचे संपादन ज्येष्ठ पत्रकार तथा माध्यम तज्ज्ञ प्रा.जयदेव डोळे, मंगलताई खिंवसरा, ज्येष्ठ संपादक प्रा.नानासाहेब गाठाळ, माजी मुख्याध्यापक लंकेश वेडे, मुक्त पत्रकार अमर हबीब, डॉ.वाल्मिक सरवदे, सुरेश पाटील, राम दोतोंडे यांनी केले आहे.

तर गौरवग्रंथ समिती मध्ये ज.वि.पवार, शांताराम पंदेरे, डॉ.सुरेश खुरसाळे, डॉ.साहेबराव गाठाळ, अण्णा खंदारे, अशोक देशमुख, चंद्रशेखर बर्दापूरकर, वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठाचे कुलसचिव प्राचार्य डी.ए.चव्हाण, सुखदेव भुंबे, उपप्राचार्य गौतम गायकवाड, डॉ.नरेंद्र काळे, प्रा.अरूंधती पाटील, प्रा.माणिक कांबळे, रमेशभाई खंडागळे, रामभाऊ पेरकर या मान्यवरांचा समावेश होता. यावेळी सभागृहात ॲड.श्यामभाऊ तांगडे, डॉ.कमलाकर कांबळे, मनोहर सिरसाट, डॉ.मुकूंद राजपंखे, राम चव्हाण, राजेश करपे, नामदेव जोगदंड, प्रकाश सिरसाट यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती. तर गौरव ग्रंथ प्रकाशन समारंभाच्या यशस्वितेसाठी प्रा.डॉ.चेतन सरवदे (चेतन पब्लिकेशन्स), सुधाताई जोगदंड, उत्तम जोगदंड, ॲड.विशाल जोगदंड, समीर मोरे, प्रा.डॉ.शंकर वाघमारे, एम.वाय.काळे, संभाजीराव सोनवणे, व्यंकटराव वेडे, प्रा.संभाजीराव बनसोडे, ॲड.वसंतराव हजारे, शशिकांत सोनकांबळे, प्रा.एम.बी.चव्हाण, डॉ.किरण चक्रे, रामेश्वर खाडे, ॲड.डी.आर.गोरे, दिलीप वैद्य, संजय भोसले, ॲड.विशाल जोगदंड, कल्याण जोगदंड, ॲड.ए.एस.धाईजे, प्रसेनजीत मस्के, संदिपान पोटभरे, भगवानराव ढगे आदींसह इतरांनी पुढाकार घेतला. कार्यक्रमाचे अतिशय सुंदर नियोजन करण्यात आले होते. तसेच उपस्थितांनी 'सम्यक पांथस्थ आबा' हा गौरवग्रंथ मोठ्या प्रमाणावर खरेदी केला. मराठवाड्याच्या विविध भागांतून लोक ग्रंथ प्रकाशन समारंभासाठी आवर्जून उपस्थित राहीले होते. यावेळी आबांवरील प्रेमापोटी चाहत्यांनी कार्यक्रमासाठी सभागृहाच्या आत व बाहेर मोठी गर्दी केली होती.

# चाकरवाडीत वारकऱ्यांचा कुंभमेळा आणि भक्तीचा संगम : माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर

नेकनूर । प्रतिनिधी

विसाव्या शतकातील संत ज्ञानेश्वर माऊली महाराज यांच्या पंचविसाव्या रौप्यमहोत्सवी पुण्यतिथी निमित्त भक्तीचा सागर आणि कुंभमेळ्याचे स्वरूप प्राप्त झाले आहे. केवळ सेवाभाव असल्याने इथे भाविकांची मांदियाळी जमली असल्याचे प्रतिपादन माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी केले तर भवसागर तरुण जाण्याचे तंत्र माऊली दादांनी जगाला दिले. माऊली दादांनी कधीच भेदभाव केला नाही. माऊलींची सेवा करण्याचं भाग्य प्रदीप मिश्रा यांना लाभले, असे प्रतिपादन ह.भ.प.रामराव ढोक महाराज यांनी केले. माऊली दादा यांच्या पुण्यतिथी निमित्त गुलालाचे किर्तन करताना ते बोलत होते.



यावेळी प्रमुख उपस्थितीत महंत लक्ष्मण महाराज मेंगडे, महंत महादेव महाराज चाकरवाडीकर, ह.भ.प.नारायण महाराज उत्तरेश्वर पिंपरीकर, ह.भ.प.रामभाऊ महाराज काजळे, ह.भ.प.नाना महाराज कदम, ह.भ.प.सुरेश महाराज जाधव, ह.भ.प.विठ्ठल महाराज आंधळे, शिवानंद महाराज गिरी, दिनकर कदम, अरुण डाके, विलास बडगे, गंगाधर घुमरे, सखाराम मस्के, तानाजी कदम, नवनाथ कुलकर्णी, अरुण बोगांणे, नानासाहेब काकडे पाटील यांच्यासह लाखो भावीक भक्तांची उपस्थिती होती.

बीड जिल्ह्यातील श्रीक्षेत्र चाकरवाडी येथे विसाव्या शतकातील महान संत विभुती ज्ञानेश्वर माऊली दादा यांच्या रोप्य महोत्सवी पुण्यतिथीनिमित्त माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांची उपस्थिती होती. यावेळी त्यांच्या हस्ते माऊलीच्या समाधीची आरती करण्यात आली तसेच प्रसिद्ध शिवकथाकार प्रदीप मिश्रा यांचे स्वागत करून माजी मंत्री क्षीरसागर यांनी आशिर्वाद घेतले. कीर्तन प्रसंगी बोलताना ते म्हणाले की, संत माऊलीच्या पुण्यतिथीला दर वर्षी भक्तांचा मोठा संगम याठिकाणी पहायला मिळतो. यावर्षी तर कुंभमेळ्याचे स्वरूप दिसू लागले आहे. लाखो भाविक कथा श्रवणासाठी इथे आले रामायणाचार्य रामराव ढोक महाराज २५ वर्षांपासून अखंडितपणे सेवा करत आहेत. सुरताल आणि भक्तीचा महापूर लोटला आहे. श्रीक्षेत्र चाकरवाडीला पंढरीच्या वाळवंटाचे स्वरूप आले आहे. माऊली बालाघाटाचे आध्यात्मिक वैभव आहे. माऊलींनी सोपा मार्ग सांगितला, अंधश्रध्दे पासून दूर करण्याचं काम माऊलीदादांनी केले आहे.

जात ना पुछो साधूकी! देखो उसका ग्यान.असा दोहा सांगितला ते म्हणाले की, इथे अनेक त्रासातून आणि संकटातून मुक्त होणारे भाविक येतात, वारकरी संप्रदाय हा फक्त भक्तीच्या मार्गावर चालतो हे माऊली प्रत्येकवेळी सांगत असत. त्यामुळे इथे प्रत्येक जातीधर्माचा भाविक जोडला गेला आहे. महिन्याची वारी करणारे हजारो भाविक आहेत. इथे सेवेकर्याची प्रथा खूप मोठी आहे असे सांगून त्यांनी माऊलीच्या चरणी अभिवादन केले. यावेळी उत्सवात गुलालाचे कीर्तन करताना रामराव महाराज ढोक यांनी संत सेना महाराज यांच्या

**उदार तुम्ही संत।**
**मायबाप कृपावंत ।।१।।**

या अभंगावर सुंदर चिंतन मांडले यावेळी पुढे बोलताना ते म्हणाले की, श्री क्षेत्र चाकरवाडीत आज भव्य दिव्य सोहळा होत आहे. सुंदर ऐश्वर्य संपन्न सोहळा होत आहे. पुण्य करणार्याची पुण्यतिथी होते. परोपकार, पुण्य आणि पाप दुसर्याला पिडा करणे आहे. माऊली दादा यांनी जगाला भवसागर तरुण जाण्याचे तंत्र दिले असे महाराज म्हणाले. यावेळी साथ संगत महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध मृदंग वादक राम महाराज काजळे, गायनाचार्य संतोष महाराज सुंबळे, अभिमान महाराज ढाकणे, भारत महाराज मुरकुटे, मुंडे महाराज, माऊली महाराज आवटे, सतीश महाराज जाधव यांच्यासह महाराष्ट्रातील नामांकित गायक वादक मंडळी उपस्थित होते.

# लोणीकर साहेब दिव्याखालीच अंधार दिसतोय?

## गुत्तेदाराने अधिकाऱ्यांना हाताशी धरून शासनाला फसविले लाखो रूपयांना?

परतुर । प्रतिनिधी


माजीमंत्री तथा परतुर-मंठा विधानसभा मतदार संघाचे भाग्यविधाते आमदार बबनराव लोणीकर हे भ्रष्ट्राचार विरोधी नेते तथा सर्वसामान्यांचे हित जपणारे आणि शासनाच्या विविध योजनेंचा सर्वसामान्यांपर्यंत लाभ पोहचविण्यासाठी सदैव कार्यरत असल्याची ओळख त्यांची राज्यात सर्वत्र आहे, परंतु त्यांच्याच मतदार संघातील भारतीय जनता पार्टीच्या ताब्यात असलेली मौजे वैजोडा ग्रामपंचायतीत त्यांच्या समर्थकाने सत्तेचा गैरवापर करून आणि प्रशासनातील अधिकार्यांना हाताशी धरून लाखों रूपयांचा भ्रष्ट्राचार केला असल्याची चर्चा मतदार संघात असुन त्यांच्या कार्यकर्त्यांने केलेल्या भ्रष्ट्राचाराची चौकशी करण्याच्या मागणी साठी आज (दि.११ जुन) पासुन गटविकास अधिकारी कार्यालया समोर सामाजीक कार्यकर्ते अशोक कोंडींबा साबळे आणि सुरेश भास्करराव कवडे यांनी आमरण उपोषण सुरू केल्यामुळे आ.लोणीकरांनी दिव्याखालचा अंधार पहावा अशी चर्चा मतदार संघातील नागरीक दबक्या आवाजात करत आहेत.




याबाबत सविस्तर वृत्त असे की, परतुर तालुक्यातील मौजे वैजोडा येथील धनगर समाजाची स्मशानभुमी तसेच दलित समाजातील स्मशानभुमी या दोन्ही स्मशानभुमीचे मंजुर झालेले कामे अद्यापही झाले नाही मात्र एमआरजीएस योजनेअंतगत बिले उचलली, मातोश्री पांदन रस्ता गुत्तेदार रामप्रसाद गिरी यांनी अधिकार्यांना हाताशी धरून थातुर-मातूर काम करून अंत्यत निकृष्ट दर्जाचा रस्ता करून बोगस बिले उचचली, तसेच वैजोडा येथील होळकर नगर (धनगरवस्ती) या ठिकाणी मंजुर झालेला सिमेंट रस्ता अन्य इतर ठिकाणी बोगस काम करून या कामाचे देखील बिले उचचली आहेत, तसेच होळकर नगर (धनगर वस्ती) या भागात मंजुर असलेली पाणी पुरवाठा पाईपलाईनचे बोगस काम करून शासनाच्या मुल्यांकनाच्या आधारे विकासकामे न करता शासनाची दिशाभुल करून बिले उचलुन सरपंच, ग्रामसेवक, इंजिनिअर, गुत्तेदार निगरगट्ट झाले आहेत, त्यामुळे त्यांनी कामांची तात्काळ चौकशी करून दोषी आढळल्यास त्यांच्यावर शासनाची फसवणुक केल्याप्रकरणी गुन्हे दाखल करून सदरील कामे ही पुन्हा पारदर्शकपणे करण्याची मागनी अशोक साबळे आणि सुरेश कवडे यांनी केली आहे.

# अरविंद गायकवाड यांचे दुःखद निधन

परळी । प्रतिनिधी



परळी भिमवाडी येथील रहिवासी सेवानिवृत्त रेल्वे कर्मचारी अरविंद केशवराव गायकवाड वय ६६ यांचं अल्पशा आजाराने दि.११ जून रोजी रात्री अकरा वाजता दुःखद निधन झाले. त्यांचा अंत्यविधी दि.१२ जून २०२५ रोजी सकाळी ११ वाजता शांतीवन समशानभूमी भीमनगर परळी येथे करण्यात आला. त्यांच्या पश्चात ४ मुले, सुना नातवंडे असा परिवार आहे. त्याच्या अंत विधीस परळी शहरातील सर्व स्तरातील प्रतिष्ठित व्यक्ती त्यामध्ये व्यापारी, प्राध्यापक, शिक्षक, वकील, विविध पक्षाचे राजकीय नेते, आजी-माजी नगरसेवक मित्र परिवार नातेवाईक मोठ्या संख्येने उपस्थित होते. त्यांच्यावर शांतीवन समशानभूमी येथे अंतिम संस्कार करण्यात आले. गायकवाड परिवार दुःख आमचा दैनिक परिवार सहभागी आहोत.

# मा.आ. बच्चू कडू यांच्या उपोषणास पाठिंबा




तलवाडा । प्रतिनिधी

दिनांक ११/६/२०२५ रोजी स्वाभिमानी शेतकरी संघटना बीडच्या वतीने बच्चुभाऊ कडू यांचे मोझरी येथे सुरू असलेले बेमुदत उपोषणाला जाहीर पाठिंबा देण्यात आला, जर बच्चुभाऊ कडू यांच्या बेमुदत आंदोलनाची शासनाने दखल न घेतल्यास व मागण्या मान्य न केल्यास बीड जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यात स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या वतीने आंदोलन छेडण्यात येईल व याची सर्वस्वी जबाबदारी शासनाची राहील. निवासी जिल्हाधिकारी यांना स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्यावतीने निवेदन देण्यात आले. यावेळी जिल्हाध्यक्ष राजू गायके, उपयुवा जिल्हाध्यक्ष शेख खिजर जैनोदीन, युवा जिल्हाध्यक्ष दिनकर रिंगणे, तालुका अध्यक्ष विलास खिसाडे व स्वाभिमानीचे कार्यकर्ते जयदेव शिंगणे यांच्या वतीने निवेदन देण्यात आले.

# सार्थक शिनगारे याची इस्त्रो व्हिजीटसाठी निवड



धारूर । प्रतिनिधी

धारूर येथिल हुतात्मा पापासिंह विद्यालयातील विद्यार्थी चि.सार्थक विनायक शिनगारे हा इयत्ता नववीत शिक्षण घेत असून विद्यार्थी सार्थक याने सि. व्ही. रमण बाल वैज्ञानिक परिक्षेत यश संपादन केले. त्याची इंडियन स्पेस रिसर्च सेंटर ईस्रो च्या व्हिजीट साठी निवड झाली असून या यशाबद्दल मंडळाचे अध्यक्ष, सचिव, शाळेचे मुख्याध्यापक व शिक्षकवृंद तसेच मित्रपरिवारा कडून त्याचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

# महादुर्गावर जागर प्रतिष्ठान कडून राज्यभिषेक सोहळा उत्साहात साजरा

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील ऐतिहासिक शहर असणाऱ्या धारूर येथील महादुर्ग गडावर जागर प्रतिष्ठानच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराजांचा ३५२ वा राज्याभिषेक सोहळा मोठा उत्साह साजरा करण्यात आला दोन दिवसाचे भव्य असे नियोजन या सोहळ्यात करण्यात आले होते राज्याभिषेकांच्या पूर्वसंध्येला रात्री मावळ्यांच्या गौरवशाली इतिहासाची आठवण करून देणारे मर्दानी खेळ आणि महाराष्ट्राचे कुलस्वामिनी आई तुळजाभवानी गोंधळाच्या आयोजन करण्यात आले होते व तसेच ९ जून सकाळी आठ वाजता टाळा मृदुंगाच्या गजरात भव्य पालखी सोहळा संपन्न झाला. त्यानंतर गडाच्या मुख्य दरवाजाला तोरण बांधून कार्यक्रमाला सुरुवात झाली विविध जाती तील ११ जोडप्यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक करण्यात आला, राज्याभिषेकासाठी सात किल्ल्यांवरील माती, प्रयागराज येथील महा कुंभाचे पवित्र जल, छत्रपतींच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या सात गडावरील पाणी, ३५२ नाणी आणि विविध साहित्यांनी मंत्रोच्चाराच्या सुमधुरतेने राज्याभिषेक करण्यात आला, गडावरील संपन्न वातावरणाने सोहळ्याला अनोखी शोभा आली कार्यक्रमाच्या सुरुवातीला वैष्णवी काळे यांचे सुमधुर असे गीत गायन झाले.



या कार्यक्रमाला जागर प्रतिष्ठान महाराष्ट्र राज्याचे संस्थापक अध्यक्ष किसन पाटील चव्हाण, क्रांतिकारी शेतकरी संघटनेचे अध्यक्ष रविकांत तुपकर, छावा क्रांतिवीर संघटनेचे अध्यक्ष करण भाऊ गायकर तसेच सामाजिक राजकीय शैक्षणिक कृषी इत्यादी क्षेत्रातील नामवंत मान्यवर कार्यक्रमाला प्रमुख उपस्थित होते, तसेच प्रमुख व्याख्याते म्हणून प्रा.अशोक बांगर यांचे अभ्यासपूर्ण भाषण संपन्न झाले.

गेल्या दोन वर्षापासून जागर प्रतिष्ठान महाराष्ट्र राज्य ही संघटना धारूरच्या किल्ल्यामध्ये राज्याभिषेक सोहळा साजरा करत आहे तसेच गेल्या पाच वर्षापासून दीपोत्सव सोहळा साजरा करत आहे येणाऱ्या काळातही संघटना ताकतीने सोहळा साजरा करणार गडकिल्ले संवर्धनाच्या हा विचार जागर प्रतिष्ठान कायम पेरीत राहील असे किसन पाटील यांनी संबोधले.

# सांची बुद्ध विहारात जेष्ठ पौर्णिमा उत्साहात साजरी

माजलगाव । प्रतिनिधी

माजलगाव शहरापासुन जवळच आसलेले सांची बुद्ध विहार, डॉ. आंबेडकर भवन केसापुरी कॅम्प येथे भारतीय बौद्ध महासभेच्या वतीन भगवान बुद्धाच्या जिवनातील पौर्णिमांचे महत्व जाणुन वर्षाच्या बाराही पौर्णीमा विविध उपक्रमाने साजरा केल्या जातात याचाच एक भाग म्हणुन जेष्ठ पौर्णिमा मोठ्या उत्साह साजरी करण्यात आली. या निमित्त व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमासाठी प्रमुख व्याख्यात्या म्हणुन भारतीय बौद्ध महासभा जिल्हा बीड पुर्व च्या महिला जिल्हा अध्यक्षा आद.कमलताई डोंगरे या होत्या तर कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणुन भारतीय बौद्ध महासभेचे तालुका अध्यक्ष डॉ. भागवत साळवे हे होते तसेच कार्यक्रमाचे प्रस्तावीक महिला तालुका अध्यक्षा मंदाताई साळवे यांनी केले. या ठिकाणी



भारतीय बौद्ध महासभा बीड जिल्हा पुर्व चे संस्कार उपाध्यक्ष एस बी मोरे यांनी मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाच्या प्रमुख व्याख्यात्या कमलताई डोंगरे यांनी बौद्ध धम्मातील जेष्ठ पौर्णीमेचे महत्व या विषयावर सखोल मार्गदर्शन केले. या कार्यक्रमासाठी भारतीय बौद्ध महासभेचे जिल्हा संस्कार सचिव शामभाऊ वाघमारे, आशाताई मोरे, जिल्हा पर्यटन सचिव के.व्ही. साळवे, एन.बी. राजभोज, जिल्हा संघटक बी.सी. डोंगरे, शारदा ताई तांगडे, वंचित बहुजन आघाड़ीचे भारत तांगडे, अंकुश आण्णा जाधव, श्रीमंत डोंगरे, सदधम्म सेवासंघाचे ट्रस्टी अरुण पोटभरे, नवनाथ गायकवाड, आप्पासाहेब भारस्कर, सेलापुरीचे उपसरपंच नाथाजी घडसे,पत्रकार किसन भदर्गे, सह परिसरातील धम्म उपासक उपासिका मोठ्या प्रमाणात उपस्तीत होते.

या कार्यक्रमाला मंदाताई साळवे यांनी भोजनदान दिले तसेच या कार्यक्रमाचे सुत्र संचलन शहर अध्यक्ष प्रा. एल.आर. मस्के यांनी केले तर आभार तालुका कोषाध्यक्ष डी एस साळवे यांनी मानले. या ठिकाणी बुद्ध दर्शन सहल करुण आलेल्या धम्म उपासकांचा सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमासाठी दयानंद साळवे, नितीन डोंगरे, बाबासाहेब घनघाव, चक्रधर पोटभरे, भगवान डोंगरे, मोहन काकडे, बळीराम काकडे, डी पी वाघमारे, डी पी पोटभरे शिवाजी कासारीकर, कोमल डोंगरे, विमल साळवे, वैशाली गायकवाड, निलावती साळवे, वैभव साळवे सह तालुका पदाधिकारी यांनी परिश्रम घेतले.

# गटविकास अधिकारी यांच्या आश्वासनानंतर युधाजित पंडित यांच्या हस्ते पाणी पिऊन बाळू तोडेकर यांनी उपोषण सोडले

# सरपंच, ग्रामसेवक, अभियंत्यावर होणार कारवाई

गेवराई । प्रतिनिधी

गेवराई तालुक्यातील भडंगवाडी येथील मनरेगा अंतर्गत गाय गोठा व जलसिंचन योजनेतील विहीर या वैयक्तिक लाभाच्या योजनेची रक्कम परस्पर उचलली असल्याकारणाने यामध्ये झालेल्या भ्रष्टाचाराची चौकशी करून संबंधितावर ठोस कारवाई करावी या मागणीसाठी येथील शेतकरी बाळू तोडेकर हे ९ जून २०२५ पासून अमरण उपोषणाला बसले होते. याबाबत बीड जिल्हा परिषदेचे माजी अर्थाने बांधकाम सभापती युधाजित पंडित, युवा नेते यशराज पंडित यांनी त्यांची तात्काळ भेट घेतली आणि गटविकास अधिकारी पंचायत समिती गेवराई यांच्याशी चर्चा केली. मागणी मान्य करून योग्य ती कारवाई केली जाईल असे गट विकास अधिकारी कांबळे मॅडम यांनी आश्वासन दिल्यानंतर शेतकरी बाळू तोडेकर यांनी तिसऱ्या दिवशी म्हणजे ११ जून २०२५ रोजी उपोषण सोडले.



भडंगवाडी येथील मनरेगा योजनेसह इतर योजनेत मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार झाला असून त्याची चौकशी करावी ही मागणी गेल्या अनेक दिवसांपासून येथील युवा शेतकरी बाळू तोडेकर यांच्यासह अनेक शेतकरी लेखी निवेदनाद्वारे संबंधित अधिकाऱ्यांकडे करत आले आहेत. परंतु त्यांच्या तक्रारीकडे दुर्लक्ष केल्याने अखेर बाळू तोडेकर यांनी ९ जून २०२५ पासून गेवराई पंचायत समिती समोर आमरण उपोषण सुरू केले होते. त्यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले होते की, २० जानेवारी २०२५ रोजी बाळू तोडेकर यांनी जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद बीड, आणि पंचायत समिती गटविकास अधिकारी यांच्याकडे तक्रार केली होती. या तक्रारीत भडंगवाडी येथील विष्णू काशिनाथ धनाडे यांची गाय गोठा आणि विहीर परस्पर प्रस्ताव दाखल करून त्याचे पैसे उचलण्यात आले आहेत त्यासोबतच आणखी काही शेतकऱ्यांचे असेच प्रस्ताव दाखल करून मोठी रक्कम उचलण्याचा प्रयत्न होत असल्याचे म्हटले होते. त्यासोबतच मनरेगा योजनेमध्ये मोठा भ्रष्टाचार झाला असून याबाबत तात्काळ दखल घेऊन योग्य ती कारवाई करण्यासंदर्भात विनंती करण्यात आली होती. या तक्रारीच्या अनुषंगाने ६ फेब्रुवारी २०२५ रोजी गटविकास अधिकारी यांनी समिती नेमून याबाबत गावात जाऊन पाच दिवसाच्या आत चौकशी करून अहवाल सादर करण्याचे आदेश दिले होते. मात्र याबाबत कोणती चौकशी समिती गावात आली नाही आणि चौकशी केली नाही. मात्र ९ व्या दिवशी तक्रारदार बाळू तोडेकर यांची तक्रार रद्द करण्यात येत असल्याचे पत्र काढण्यात आले. याबाबत बाळू तोडेकर यांनी गटविकास अधिकारी यांच्याकडे तक्रार रद्द का केली अशी विचारणा केली असता न्यायालयाचा दाखला देत आपण न्यायालयात गेला होतात आणि त्यामुळे न्यायालयाने आपली तक्रार रद्द केल्याचे सांगण्यात आले. यानंतर पुन्हा चौकशी समिती नियुक्त करण्यात आली परंतु त्यांनी सुद्धा कुठलीही गावात येऊन पाच दिवसात चौकशी केली नाही. पण त्यानंतर ४ मार्च २०२५ रोजी सरपंच यांच्या संपर्कात असलेल्या काही लोकांनी बाळू तोडेकर यांना त्या ठिकाणी गाठून धमकी देऊन मारहाण केली अशी तक्रार सुद्धा त्यांनी केली आहे. बाबत गेवराई पोलीस स्टेशनला गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. आपल्या मागण्या जोपर्यंत मान्य होत नाही तोपर्यंत आपण उपोषण सोडणार नाही या भूमिकेवर ठाम असलेले बाळू तोडेकर व त्यांचे सहकारी गेल्या तीन दिवसापासून पंचायत समिती समोर आमरण उपोषण करत होते. ही माहिती मिळतात बीड जिल्हा परिषदेचे माजी अर्थ व बांधकाम सभापती युधाजित पंडित, युवा नेते यशराज पंडित यांनी तात्काळ आंदोलनकर्त्यांची भेट घेतली. गट विकास अधिकारी यांच्याशी चर्चा करून, बाळू तोडेकर यांच्या मागणीबाबत योग्य कारवाई करण्यासंदर्भात मागणी केली.

याबाबत गटविकास अधिकारी कांबळे मॅडम यांनी बाळू तोडेकर यांनी केलेली मागणी मान्य करत त्याबाबत योग्य ती कारवाई केली जाईल असे आश्वासन दिले. तसेच याबाबत नियुक्त करण्यात आलेल्या समितीने अहवाल दिला नसल्याचा ठपका ठेवून, यातील श्रीमती व्ही एम सासवडे शाखा अभियंता, श्री माळतकर अरविंद सहाय्यक कार्यक्रम अधिकारी, महादेव येवले ऑपरेटर आणि श्री वादक यांचेवर मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद बीड यांनी कारवाई करण्यासंदर्भात मागणी करण्यात आली आहे. या आश्वासनानंतर माजी सभापती युधाजित पंडित यांच्या हस्ते पाणी पिऊन बाळू तोडेकर, विष्णू धनाडे, नारायण धराडे, बजरंग निकम या शेतकऱ्यांनी आपले उपोषण मागे घेतले. यावेळी युवा नेते यशराज पंडित, महादेव औटी, कैलास माने, सरपंच बंडू पवार, शेख शहेदाद, अतुल खरात, उज्वल सुतार, आप्पासाहेब चव्हाण, सरपंच राऊत आधी सह कार्यकर्ते बहुसंख्येने उपस्थित होते.

# गुटखा, जुगार व अवैध दारूवर छापे

## डिवायएसपी पूजा पवार यांची धडाकेबाज कारवाई

बीड । प्रतिनिधी

बीड तालुक्यात अवैध धंदे तसेच गुंडगिरी करणाऱ्याच्या प्रमाणात दिवसेंदिवस वाढ होत असून गुन्हेगारांचा फास आवळ्यासाठी बीड पोलीस अधीक्षक शर्थीचे प्रयत्न करत आहेत. धडाकेबाज कामगिरीतून अल्पावधीत प्रशिक्षणार्थी पोलीस उपाधीक्षक तथा पिंपळनेर पोलिस ठाण्याच्या प्रभारी अधिकारी डीवाएसपी पूजा पवार यांनी आपल्या कारवाईतून ओळख निर्माण करत अवैध धंदे करणाऱ्यावर धडकी भरवली आहे.



धडाकेबाज कारवायातून पिंपळनेर पोलीस ठाणे हद्दीतील गुटखा, मटका, अवैध दारू विक्री, वेश्या व्यवसाय, वाळू, यासह इतर अवैध धंदे आणि अवैध धंद्यातील माफीयांचे कारवाईच्या जोरदार दणक्याने कंबरडे मोडले आहे. डीवायएसपी पूजा पवार या उल्लेखनीय कामगिरीमुळे चांगल्याच चर्चेत आल्या आहेत. त्यांनी वडवणीसह बीड शहरात देखील अवैध धंद्यावर कारवाया केल्याने यांची एक डॅशिंग पोलीस अधिकारी म्हणून ओळख झाली आहे.

या बाबत मिळालेली माहिती अशी की, पोलिस ठाणे पिंपळनेर हद्दीमध्ये मौजे शिवणी येथे किराणा दूकाणामध्ये अवैद्य गूटखा विक्री होत असल्याची गोपनीय माहिती पूजा पवार यांना मिळाल्याने त्यांनी आपल्या टीमला सोबत घेऊन पोलीस स्टाफसह मिळालेल्या बातमीच्या ठिकाणी जाऊन छापा मारला. यावेळी विनायक किराणा दुकानामध्ये वेगवेगळया कंपणीचा १०४८० रू चा गूटखा मूद्देमाल मिळून आला आहे. या प्रकरणी पिंपळनेर पोलिस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आला. त्यानंतर पूजा पवार यांनी अवैध दारू विक्रीवर कारवाई केली. पो स्टे पिंपळनेर हद्दीमध्ये मौजे जूजगव्हाण येथे महिला नामे रूक्मिनी काशिनाथ थोरात व कोंडाबाई भिमराव गायकवाड या अवैद्यरीत्या दारूविक्री करत असल्याची माहिती मिळाली होती. त्यावरून पूजा पवार व त्यांच्या टीमने सदर ठिकाणी पोलीस स्टाफ सह छापा मारला असता रूक्मिनी काशिनाथ थोरात यांचे ताब्यामध्ये ४८९५ /- रू चा देशी विदेशी दारूचा मूद्देमाल मिळून आला तसेच कोंडाबाई भिमराव गायकवाड यांचे ताब्यामध्ये ४०७० /- रू चा देशी विदेशी दारूचा मुद्देमाल मिळून आल्याने दोन्ही महिलांचे विरूद्ध पिंपळनेर पोलिस ठाणे येथे गुन्हे दाखल करण्यात आले. ही कारवाई पोलिस अधीक्षक नवनीत कॉवत, अप्पर पोलिस अधीक्षक सचिन पांडकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस उपअधीक्षक पूजा पवार यांनी केली.

# जातिवादी गावगुंडाची दलित सरपंचांच्या कुटूंबास जिवे मारण्याची धमकी

परळी । प्रतिनिधी

ग्राम पंचायतच्या कामामध्ये नाक का खुपसतो? म्हणत चक्क सरपंचांच्या कुटुंबांसच शिवीगाळ आणि जिवे मारण्याची धमकी देण्याचा प्रकार बहुचर्चीत परळी तालुक्यातील दैठणाघाट गावात घडला आहे. काल दि.१०-६-२०२५ रोजी या प्रकरणी परळी ग्रामिण ठाण्यात भारतीय न्याय संहितेच्या कलमासह क्ट्रासीटी क्टने गावातील हनुमंत गुट्टे, शिवाजी गुट्टे, व गोवींद गुट्टे यांच्या विरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.

याबाबत थोडक्यात माहिती अशी कि, बापुराव आप्पा उधारे हे दैडणा घाट गावचे विद्यमान सरपंच आहेत, मात्र ते मागास जातीतील असल्यामुळे त्यांना गावातील वरील गावगुंड हे ग्रामपंचायत मार्फत कुठलेही विकासकाम करू देत नाहीत आणि स्वत:च्या मनमानी प्रमाणे ग्रामपंचायत चा कारभार हाकण्याचा प्रयत्न करतात, सरपंच नात्याने त्यांच्या कारभारास विरोध केल्यानंतर मांगट्यानो तुम्हाला कचऱ्यातून बाहेर काढून इथपर्यंत आनलय आणि तुम्हीच आमच्या विरुद्ध जिल्हाधिकाऱ्याकडे अर्ज फाटे करता का? असे महणतात.०३ जुन २०२५ रोजी रात्री भरस्त्यात सरपंच पत्नी लताबाई बापुराव उधारे यांना वरील तिघांनी रात्री रस्त्यात अडवून शिवीगाळ आणि संपूर्ण कुटुंबांस जीवे मारण्याची धमकी दिल्यामुळे त्यांच्या फिर्यादीवरून परळी ग्रामिण ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या गुन्हयाचा तपास परळी ग्रामिण पोलीस कसा करतात ते लवकरच पहायला मिळणार आहे.

## क्या हुवा तेरा वादा? म्हणत शिवसैनिकांसह शेतकऱ्यांचे राष्ट्रीय महामार्गावर जनआंदोलन

# जनसामान्यांची फसवणूक करणारे सरकार : उल्हास गिराम

बीड । प्रतिनिधी

महाविकास आघाडी सत्कार जन सामान्यांची फसवणूक करून सत्तेवर आले आहे. निवडणुकी पूर्वी जी आश्वासने दिली त्याला तिलांजली देऊन, हे फसवे सरकार स्थापन झाले आहे. या आघाडी सरकारला त्यांच्याच फसव्या घोषणाची आठवण करून देण्यासाठी आज विधानपरिषदे चे विरोधी पक्ष नेते आंबादासजी दानवे यांच्या आदेशानुसार शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने आज उल्हास गिराम यांच्या नेतृत्वाखाली शिवसैनिक व शेतकऱ्यांनी आज बीड शहर बायपास वरील महामार्गांवर रास्ता रोको आंदोलन केले.



शेतकऱ्यांना कर्ज मुक्त करून, शेतकरी सन्मान योजनेतून पंधरा हजार रुपये देण्याची घोषणा, लाडक्या बहिणींना पंधराशे ऐवजी एकविशे देणार, शेतकऱ्यांना एक रुपयात पीक विमा देऊन प्रत्यक्ष खात्यावर नुकसान भरपाई देणार, वृद्ध पेन्शन धारकांना एकवीसशे रुपये देणार होते, शेतीला चोवीस तास विज, हर घर जल - हर घर छत या सारख्या शेकडो फसव्या घोषणा करून सामान्य जनता, महिला, शेतकऱ्यांची दिशाभूल करून हे सरकार सत्तेवर आले.

या सरकारला त्यांच्याच घोषणाची जाणीव करून देण्यासाठी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने जिल्हाप्रमुख उल्हास गिराम यांनी शिवसैनिक, शेतकरी व महिलांना एकत्रित करत बीड शहर बायपास, महालक्ष्मी चौक या ठिकाणी राष्ट्रीय महामार्गांवर रास्ता रोको करून जन आंदोलन केले. यावेळी महिला जिल्हा संघटक मीराताई नवले, सोपान काका मोरे तालुका प्रमुख शिरूर, मुकुंद शिंदे तालुकाप्रमुख पाटोदा, अजय दाभाडे, बबलू दिवे तालुकाप्रमुख गेवराई संजय महाद्वार, हनुमान जगताप, सुशील पिंगळे, राजू मोहाले, रतन गुजर, दीपक बाप्पा मोरया, अशोक हिरडे, अशोक जाधव, कृष्णा चौरे, तात्या रोडे, पंकज कुटे, अजिंक्य डोरले, रवी वाघमारे, प्रदीप कोठुळे, नयुब पठाण, दादासाहेब सोनवणे, मशरू पठाण, महादेव परस्कार, अक्षय काशीद, राम अंतापुरकर, बाळू वैद्य, सतीश मस्के, रमेश सुरवसे, सखाराम कोरडे, मच्छिंद्र काळे, हनुमान काशीद, चंदूनाना कागदे, गोविंद शिंदे, विशाल पवार, बाळासाहेब लांडे, अशोक चव्हाण, विकास कदम, नितीन कुठे, शिंदे रावसाहेब, गणेश लोणकर, सतीश परदेशी, दिलीप पवार, रंगनाथ पैठणकर, नारायण काशीद, संतोष काशीद, बाळासाहेब, प्रतीक वाघमारे मारुती वाघचौरे, दाऊद शेख, शरद पवार, राजू गोपाळ आदी शिवसैनिक उपस्थित होते.

# शिवसेना उबाठा पक्षाच्या बीड तालुका उपप्रमुख पदी रामनारायण जाधव



बीड । प्रतिनिधी

बीड तालुक्यातील मौजवाडीचे माजी सरपंच व गेल्या अनेक वर्षांपासून शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे व पक्षप्रमुख उद्धवसाहेब ठाकरे यांच्या विचारांशी व मातोश्रीशी एकनिष्ठ असणारे कडवट शिवसैनिक रामनारायण मनोहर जाधव यांची पक्षप्रमुख उद्धव साहेब ठाकरे यांच्या आदेशानुसार व संपर्कनेते सुनिलजी प्रभु, संपर्कप्रमुख परशुरामजी जाधव साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली व जिल्हाप्रमुख गणेश भाऊ वरेकर यांच्या नेतृत्वाखाली आज मौजवाडी येथे शिवसैनिकांच्या बैठकीत जिल्हाप्रमुख गणेशभाऊ वरेकर व तालुकाप्रमुख गोरख अण्णा सिंघन यांनी नियुक्ती पत्र देऊन निवड केली. यावेळी या निवडीचा गावकऱ्यांनी जोरदार समर्थन करित तोफा वाजवून स्वागत केले व जिल्हाप्रमुख व तालुकाप्रमुख यांचा सत्कार करुन आभार मानले. यावेळी माजी सरपंच कमलाकर जाधव, चेअरमन रामभाऊ बनसोड, रामदास कासकर, मच्छिंद्र जाधव, धर्मराज सालुगडे, सुग्रीव जाधव, हनुमान ढेंगे, परमेश्वर बनसोड, बाबु मुळे, भैरवनाथ जाधव, अंकुश कासकर, शाहु मुळेकर, बापूराव ढेंगे, वैजिनाथ चव्हाण, राजाभाऊ जाधव यांच्यासह गावकरी व शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# आष्टीसह परिसरात वादळ वाऱ्यासह पावसाचा कहर

## आष्टी तालुक्यात ढगांच्या गडगडासह अवकाळी पावसाचा तडाखा, शेतकऱ्यांचे मोठे नुकसान

आष्टी । प्रतिनिधी

आष्टी तालुक्यात गेल्या दिवसापासून ढगा वातावरण असून गुरुवारी सायंकाळी पाच ते सहाच्या दरम्यान पावसाला सुरुवात झाली. अनेक ठिकाणी घरावरील पत्रे पत्रे तर विद्युत खांबे अनेक ठिकाणी उन्मळून पडल्याचे निदर्शनास आले.




रात्रभर विद्युत पुरवठा खंडित पडला होता. घरावरील पत्रे उडून गेल्याची मोठ्या प्रमाणात नुकसान झाले तर अनेक ठिकाणी झाडे उन्मळून पडले.

ढगांच्या गडगडाटासह विजेच्या कडकडात वादळी वाऱ्यासह पाऊस झाला असून शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाली. तालुक्यातील कडा आष्टी धामणगाव चोभा निमगाव वेताळवाडी सुरुडीसह अनेक गावात वादळ झाल्याने मोठे नुकसान झाले. बावी येथील अनेक घरावरील पत्रे उडून गेले. अनेक शेतकऱ्यांचा संसार उघड्यावर पडला आहे तर जनावरांच्या पत्र्याचे शेड उडून गेले आहेत. या नुकसानीचे पंचनामे करून मदत देण्याची मागणी शेतकऱ्यांकडून होत आहे.

## चक्रीवादळ पावसाळामुळे उद्भवलेल्या परिस्थितीचे तात्काळ पंचनामे करा : तहसीलदार वैशाली पाटील

आष्टी । प्रतिनिधी

आष्टी तालुक्यासह परिसरात वादळी चक्रीवादळाचे नुकसान या परिसरात झाले असून या परिसरात जोरदार पावसाने हजेरी लावत वादळ वाऱ्यासह कहर केला आहे. तात्काळ नुकसानीमुळे उदभवलेल्या परिस्थितीचे पंचनामे करावेत असे आदेश तहसीलदार वैशाली पाटील यांनी दिले आहेत.



आष्टी शहर व परिसरात अचानक उद्भवलेल्या चक्रीवादळामुळे अनेक भागात अतोनात नुकसान शेतकरी व आष्टी शहर नागरिकांचे झाले असून यामध्ये अनेक ठिकाणी राज्य महामार्ग व राष्ट्रीयमहामार्गावरील मोठं मोठे झाडे मुळा सकट उन्मळून पडलेले असून महावितरण च्या तारासह पोल खाली पडले असून या पडलेल्या पोल व झाडामुळे महामार्गावरील रस्ते बंद पडले होते तर शेतातील शेतीमालाचे देखील मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.या नुकसानग्रस्त भागाची पाहणी करत तहसीलदार वैशाली पाटील यांनी करत या नुकसानग्रस्त भागाची तलाठी, ग्रामसेवक व कृषी सहाय्यक यांनी तात्काळ पंचनामे करावेत असे आवाहन आष्टीचे तहसीलदार वैशाली पाटील यांनी केले आहे.

# श्री.वैद्यनाथ देवस्थान ट्रस्टच्या जमिनीवरील अतिक्रमण हटवण्याच्या मागणीसाठी उपोषण

परळी । प्रतिनिधी

परळीमधील वैद्यनाथ देवस्थानच्या जमिनीवर अतिक्रमण वातावरण तापलं देवस्थानच्या पुजाऱ्यांचे उपोषण सुरू परळीतील वैद्यनाथ देवस्थानच्या जमिनीवर ती क्रम हटवण्यास यावे यासाठी तहसील कार्यालय समोर उपोषण एक दिवशी करण्यात आले आहे. परळी शहराच्या बाजूला व वैद्यनाथ मंदिराच्या शेजारी ३२२ गट नंबर यातील दहा एकर जमीन पुजारी वर्गासाठी उपजीविका भागवण्यासाठी पुजारी वर्गाच्या जमिनीवर गाव गुंडांनी व भुमापियानी अतिक्रमण केले आहे. त्यांनी शासनाला २०१५ मध्ये अर्ज केलेला होता ती या जमिनीवर अतिक्रमण झालेला आहे.



गट नंबर ३२१ मध्ये घरकुल बांधकाम केले आहेत महाराष्ट्र विष्णू सेना यांच्या पाठीमागे आहे. मागणी आणि गेल्या वीस वर्षापासून करीत आहेत हायकोर्टाने देखील देवस्थानच्या इनामी जमिनीचा आमच्या बाजूने निकाल दिलेला आहे. हायकोर्टाचा निकाल त्यांच्यासोबत आहे दिवाणी न्यायालयाचा निकाल त्यांच्यासोबत आहे. हायकोर्टाचा आणि दिवाणी न्यायालयाचा निकाल लागून सोळा वर्षे झाले तरी या ३२२ व ३२१ मधील अतिक्रमण हटविण्यात आले नाही यासाठी आम्ही उपोषण तहसील कार्यालय ते करीत आहेत. प्रभु वैद्यनाथा साठी तुम्ही तिनशे कोटी निधी आणतात आणि पाचशे मिटर आतरावरील अतिक्रमण का तुम्ही काढत नाही हे आमचा सवाल आहे.

प्रभु ज्योतिर्लिंग वैद्यनाथ चे अतिक्रमण हटविण्यात यावे व त्या जागेवर तुम्ही जे तीनशे कोटी आणलेले रुपये आहेत ते त्या जागेत उपयोगी आणावे ही पुजाऱ्यांची नम्र विनंती आहे त्या ठिकाणी भाविकांना राहण्याची सोय व करण्यात यावी २०२३ला अतिक्रमण धारकाचे पत्र दिले होते त्यावर आज प्रयत्न काहीच शाशने केले नाही. मडळ अधिकारी यानी कसलाही अवाहाल सादर केला नाही. त्यावेळी तिथे फक्त पाचच घरे होते पण मडळ अधिकारी याने काहीच केले नाही. पुजारीसाठी जमिन दिली होती. या वेळी काही वकील उपस्थित होते. या कमिटीचे तहसीलदार अध्यक्ष आहेत यासाठी अतिक्रमण करण्यावर कडक कारवाई करण्यात यावी यासाठी उपोषण करण्यात येत आहे.

# वक्फ बोर्ड जागेची भाडे पत्र करारनामा नो एंन्ट्री पेपरवर विक्री होत असून तात्काळ अतिक्रमण थांबा : कुरेशी

माजलगाव । प्रतिनिधी

माजलगांव शहरातील नगरपरिषद अंतर्गत जाग असून ती जलाल शाह बाबा दरगाह ची देख देख करुन संभाळण्यास देण्यात आलेली आहे परंतु त्या जागेची भाडे पत्र व कारनामा नोटरी करून लाखो रुपये मध्ये विक्री करून मोकळे होत आहेत.



तसेच करारनामा लिहून त्या ठिकाणी शेड व घर चे कामे होत आहे. आज त्या जागेवर अतिक्रमण करणे चालू आहेत. आज त्या जागेची शेतीसाठी वापरली जात होती परंतु त्या जागेची विक्री होत आहे. सर्वे नंबर.८ व सर्वे नंबर.७ च्या बाजूला असून तात्काळ चौकशी करून आज होणारे अतिक्रमण तात्काळ थांबवा. वक्फ बोर्ड ची जागेची विक्री करणाऱ्या वर योग्य कारवाई करण्यात यावी तसेच बोर्ड पेपर वर भाडेपत्र करून व करारनामा लिहून देत त्यांची विक्री करित आहे त्यांची सखोल चौकशी करुन गुन्हे करण्यात यावे व अतिक्रमण तात्काळ पाडण्यात यावे, अशी मागणी महाराष्ट्र युवक प्रतिष्ठान जिल्हाध्यक्ष मुस्ताक कुरेशी यानी जिल्हाधिकारी यांच्याकडे ईमेल व्दारे केली असून तात्काळ दाखल न घेतल्या स लोकशाही मार्गाने विविध सुरुपात आंदोलन करण्यात येईल.

## पंतप्रधान नरेंद्र भाई मोदी यांच्या नेतृत्वात देश प्रगतीपथावर वाटचाल करत आहे : किरण पाटील

# मोदीजींच्या कल्याणकारी योजना घराघरापर्यंत पोहोचवणार : शंकर देशमुख

बीड । प्रतिनिधी

देशाचे पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांच्या सरकारची गौरवपूर्ण अकरा वर्ष पूर्ण झाल्याबद्दल बीड जिल्हा भारतीय जनता पार्टीच्या वतीने एक दिवशीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. भारतीय जनता पार्टीच्या राष्ट्रीय सचिव तथा महाराष्ट्र राज्याच्या पर्यावरण आणि पशुसंवर्धन मंत्री पंकजाताई मुंडे यांच्या सूचनेप्रमाणे आयोजित करण्यात आलेल्या या कार्यशाळेस कार्यशाळेस प्रमुख अतिथी म्हणून महाराष्ट्र भारतीय जनता पार्टीचे प्रदेश सचिव किरण पाटील हे उपस्थित होते तर भारतीय जनता पार्टीचे अध्यक्ष शंकर देशमुख, जिल्हा सरचिटणीस प्रा. देविदास नागरगोजे, डॉ. स्वरूप सिंह हजारी, नवनाथ शिराळे, सलीम जहांगी, अशोक लोढा, श्रीकांत सानप, प्रकाश काका सुरवसे, बबन अण्णा झांबरे यांच्या प्रमुख उपस्थितीत ही कार्यशाळा संपन्न झाली. या कार्यशाळेत बोलताना किरण पाटील यांनी मोदीजींच्या नेतृत्वात भारत महासत्तेकडे वाटचाल करत असून मोदींच्या स्टार्ट अप इंडिया लोकलचे ग्लोबल मेक इन इंडिया या संकल्पनांमुळे देश प्रगतीच्या वाटेवर वाटचाल करत आहे असे उद्गार काढले तर जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अनेक जनकल्याणाच्या योजना आणून देशातील गरीब वर्गाच्या जीवनमानात सुधारणा करण्यासाठी प्रयत्न केले आहेत मोदीजींच्या लोक उपयुक्त योजना भारतीय जनता पार्टीच्या वतीने लोकांच्या घराघरापर्यंत पोहोचवण्याचे प्रयत्न आपण करणार आहोत असे विचार याप्रसंगी त्यांनी व्यक्त केले.




पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सरकार स्थापनेच्या अकरा वर्षपूर्ती निमित्त देशभरामध्ये भारतीय जनता पार्टी विभिन्न कार्यक्रम आयोजित करत असुन सेवा सुशासन व गरीब कल्याण या संदर्भात केंद्र सरकारने राबवलेल्या विविध योजना या निमित्ताने जनतेपर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न केला जात आहे. बीड जिल्हा भारतीय जनता पार्टीने देखील या संदर्भात विविध कार्यक्रमाचे आयोजन केलले असुन जिल्ह्यातील सर्व मंडळाच्या ठिकाणी वृक्षारोपण, मोदीजींच्या विविध योजनांवर चर्चा करण्याठी कॉर्नर बैठका सारख्या कार्यक्रमाचे आयोजन केले असून जिल्हास्तरावर संकल्प सिद्धी या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते तर मोदी सरकारच्या विविध योजनांची माहिती देण्यासाठी लवकरच पत्रकार परिषदेचे आयोजन करण्यात येणार आहे.

बीड येथील भारतीय जनता पार्टीच्या जिल्हा कार्यालयावर संपन्न झालेल्या या कार्यशाळेत प्रा. देविदास नागरगोजे यांनी कार्यशाळेच्या प्रस्ताविक पर सत्रात संकल्प ते सिद्धी-सेवा सुशासन व गरीब कल्याणाची अकरा वर्ष या विषयावर मांडणी केली तर जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख यांनी विकसित भारताची संकल्पना या विषयावर आपले विचार मांडले. कार्यशाळेच्या समारोप पर सत्रात किरण पाटील यांनी मोदी सरकारची गौरवपूर्ण उपलब्धी -भारताची महासतेकडील वाटचाल, या विषयावर आपले विचार मांडले. या कार्यशाळेत डॉ.स्वरूप सिंह हजारी, सलीम जहागीर, नवनाथ शिराळे, अशोक लोढा, अजय सवाई, पि टी चव्हाण यांनी विविध विषयावर आपले विचार मांडून कार्यशाळेत सहभाग नोंदवला. कार्यशाळेच्या प्रारंभी भारत मातेची प्रतिमा व पंडित दीनदयाजी उपाध्याय, श्यामाप्रसादजी मुखर्जी, गोपीनाथरावजी मुंडे साहेब यांच्या प्रतिमांचे पूजन करण्यात आले व प्रमुख मान्यवरांचा सत्कार करण्यात आला.

कार्यशाळेस भाजपाचे सर्व जिल्हा पदाधिकारी व मनोज पाटील, अशोक रसाळ, उद्धव रासकर ,सचिन दाभाडे, राजेंद्र पवार, विनायक रत्नपारखी, अभिजीत सोळुंके, सुखदेव रेडे, संजय गंभीरे, गोकुळ कदम हे मंडळ अध्यक्ष उपस्थित होते. भारतीय जनता पार्टीच्या सर्व आघाड्या व मोर्चाचे पदाधिकारी व कार्यकर्ते व नागरिक मोठ्या प्रमाणात उपस्थित होते. कार्यशाळेचे सूत्रसंचालन शांतिनाथ डोरले यांनी केलं तर आभार प्रदर्शन केज मंडळाचे तालुका अध्यक्ष भगवान केदार यांनी केले. कार्यशाळा यशस्वी करण्यासाठी दत्ता महाजन, सुनील मिसाळ, विष्णू महाराज सरवसे, राजू शहाणे, अमोल वडतीले, बन्सी हावळे, केशव बडे यांनी प्रयत्न केले.

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT